# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२७/०५/२०१८

## दि.२६/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | एमआयडीसी भोसरी पो स्टे १७०/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | सोनपडु पाटील, वय ५५ वर्षे,रा.खेडी व्यारर्दे,ता.आमेळनर,जि.जळगाव |
| **आरोपी** | खाजगी बसवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१२/२०१७ रोजी रात्रौ ०८/०० वा.चे सुमारास पुणे नाशिक रोड, जंजरी हॉटेल सार्वजनिक रोडवर, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा समाधान उर्फ सेनपडु सोनपडु पाटील, हा गायत्री ट्रव्हलर्स येथे क्लिनर म्हणुन काम करत होता.वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, गायत्री ट्रव्हलर्स आबळनेर या बस गाडीवर क्लिनर म्हणुन काम करत असताना पुणे नाशिक रोड जंजरी हॉटेल समोर सार्वजनिक रोडवर गाडी पॅासेंजर घेण्याकरीता थांबली असताना तो गाडीतुन दरवाज्याच्या पायरीवरुन उतरत असताना तो खाली पडल्याने त्याचे डोक्यास मार लागुन त्यात तो जखमी होवुन मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.बी. पवार ९८५००९५१२४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ३७३/१८,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | सुर्यभान यादव,वय १९ वर्षे,रा.चिखली,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०५/२०१८ रोजी सकाळी ०७/३० वा.चे सुमारास भोला हॉटेलजवळ चिंचवड, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी हे पायी जात असताना भोला हॉटेलजवळ चिचंवड,पुणे येथे फिर्यादी यांचे पाठीमागुन मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवुन, फिर्यादीला यांना हाताने मारहाण करुन,चाकुचा धाक दाखवुन,फिर्यादीच्या हातातील मोबाईल ८ हजार ५००/- रुपये किंमतीचा जबररस्तीने हिसका मारुन चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बढे ८८८८८१३४५२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे १८४/१८,भादविक ३५३,३३२,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एस.डी.लामतुरे,पो.शि.खडक,पो.स्टे. पुणे शहर |
| **आरोपी** | अनिकेत संजय अडागळे,वय २१ वर्षे,रा.५५३ कासेवाडी,भवानी पेठ, पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २६/०५/२०१८ रोजी राञौ ०२/०० वा.चे सुमारास बाबु मामडी चौक,लोहियानगर,पुणे. |
| **तपशिल** | यातील नमुद इसम अनिकेत संजय अडागळे हा वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी मोठमोठयाने आरओरडा करुन, रहिवाशांना शिवीगाळ करुन मारहाण करीत असताना मिळुन आल्याने त्यास फिर्यादी हे लोहीयानगर पोलीस चौकी याठिकाणी घेवुन जात असताना त्याने फिर्यादी व पोलीस शिपाई खामकर यांना शिवीगाळ करुन, धक्काबुक्की करुन,खाली ओढुन सरकारी वाहनासह खाली पाडुन,फिर्यादी करीत असलेले शासकीय कर्तव्य कायदेशीरपणे करत असताना,फिर्यादी यांचे कायदेशीर कर्तव्यात प्रतिबंध करुन अडथळा निर्माण केला. फिर्यादी हे त्यास लोहियानगर पोलीस चौकी येथे घेवुन गेले असता,त्याने राञगस्त अधिकारी यांना शिवीगाळ करुन,त्यांच्या सोबतचे स्टाफला देखील शिवीगाळ करुन धक्कबुक्की करुन, धमकावुन शासकीय कर्तव्य कायदेशीरपणे करीत असताना अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. टेमगिरे ९५५२५५२४१८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरुड पो स्टे १५१/१८,भादविक ३७९,४२०,३४,भारतीयवन अधिनियम १९२७ चे.क.४२,२६ (फ),मुंबई वन अधि.१९४२ क. ६६,८२,१२९ |
| **फिर्यादी** | इरफान मोमीन,पो.ना.युनिट-१ पुणे शहर |
| **आरोपी** | राहुल हरीदास इंगळे,वय ३० वर्षे,रा.फ्लॅट नं.३०३, श्रध्दा रेसीडेंसी,यश हॉटेल पाठिमागे भुगाव, ता.मुळशी जि.पुणे(अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०५/२०१८ रोजी १५/०५ वा.चे सुमारास वनाज कंपनीजवळ, कोथरुड,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसम याने त्यांचा उददेश साध्य करण्याकरीता स्वतःच्या फायद्याकरीता हुंडाइ आय १० या गाडीमध्ये एकुण ३ लाख ६० हजार रू.कि.चे प्रतीबंधीत विनापरवाना बेकायदा ५९ किलो वजनाचे रक्तचंदनाच्या लाकडाची तोड करुन चोरून विक्री करण्याचे उददेशने भरून, शासकिय अधिकारी यांची फसवणुक करण्याचे उद्देशाने भरून,वाहतुक करुन घेवुन जात असताना चारचाचाकी गाडीसह सर्व मिळुन एकुण ५ लाख ६० हजार ५००/-रु. किमतीचे मालासह मिळुन आले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धोत्रे ८४२२९९५१५२ |

## दि.२७/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ३६३/१८,भादविक ३९५,आर्म ॲ.क.४(२५),सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंधक कायदा क.३,७ महा.पो.का.क.३७(१)(३)सह १३५ |
| **फिर्यादी** | स्वप्निल वाघमारे, वय २४ वर्षे,रा.निगडी,पुणे |
| **आरोपी** | १)लखन सातव, २)रोहित सकट ३)अक्षय कसबे, इतर ३ ते ४ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०५/२०१८ रोजी रात्रौ ११/३० वा.चे सुमारास काळभोर गोठ्याजवळ रिठै चौक, संजय हॉटेल जवळ, राजनगर ओटा स्कीम निगडी,पुणे व स्किम नं.०६ सिध्दीविनायक मंदिराशेजारी यमुनानगर, निगडी,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसमांनी त्याचे हातामध्ये कोयते घेवुन येवुन त्यापैकी लखन सातव याने फिर्यादी यांचे खिशातील ५००/- रुपये रोख रक्कम जबदरस्तीने काढुन घेवुन, इतर इसमांनी रस्त्याचेकडेला पार्क केलेल्या २ छोटा हत्ती, ४ कार, ४ रिक्षा, १ मोटार सायकल यांची तोडफोड करुन, एकुण अंदाजे ३० हजार रुपयाचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.सुर्यवंशी ९७६७८५११०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे २६७/१८,भादविक ३९२,३४, आर्म ॲ.क.४(२५ |
| **फिर्यादी** | संजय शिंदे, वय ५० वर्षे,रा.नारायणगाव,ता.जुन्नर,जि.पुणे |
| **आरोपी** | १)अशोक लक्ष्मण माकुडे,वय २२ वर्षे,रा.चिंचवडगाव,पुणे २)योगेश गुलाब बाठे,वय २१ वर्षे, रा.किरकटवाडी, खडकवासला,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२०१८ रोजी रात्रौ १२/०० वा.चे सुमारास एच.पी.पेट्रोलपंपाजवळ, मुंबई बेंगलोर हायवे रोडवर,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचा मुलगा त्यांचे टेम्पोजवळ झोपले असताना, यातील नमुद इसमांनी ॲक्टीव्हा मोटार सायकलवरुन त्यांचे जवळ येवुन फिर्यादी यांना झोपेतुन उठवुन, त्यांना शिवीगाळ करुन, कोयत्याचा धाक दाखवुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन, फिर्यादी यांचे खिशातील रोख रक्कम २ हजार १००/-रुपये काढुन घेतले त्यावेळी पेट्रोलिंग करणारी पोलीसांची गाडी तेथे आली व पोलीसांनी त्या दोन इसमांनी येथे काय करताय असे विचारले व त्यांना काही न सांगितल्याने व संशयास्पद हालचालीमुळे त्या दोन इसमांना पोलीसांनी ताब्यात घेवुन हिंजवडी पो.स्टे.येथे घेवुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.एन.निकम ८२७५१६०६७२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**